आरे दुग्ध वसाहतीतील मौजे पहाडी गोरेगांव येथील सी.टी.एस. क्र. ५८९ (भाग) मधील ५००० चौ.मी. क्षेत्र ख्रिश्चन दफ़नभूमीस देण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः एएमसी-२०१२/प्र.क्र.१९०/पदुम-१०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २० नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

1) **अतिरीक्त सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पी.आय.एल. ६६/२०१७ च्या संदर्भात दि. १७/११/२०१७ रोजीचे पत्र.**
2) **आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे पत्र क्र.आदुवि-१६/आरे जमीन/ख्रिश्चन दफ़नभूमी/प्र.क्र. १८/२०१७/५१४९, दि. १४/११/२०१७**
3) **नगर विकास विभाग यांची दि. २४/५/२०१६ रोजीची अधिसूचना**

प्रस्तावना :-

प्रस्तूत प्रकरणी आरे दुग्धवसाहतीतील मौजे पहाडी गोरेगांव येथील सी.टी.एस. क्र. ५८९ (भाग) मधील ७५०० चौ.मी. जागा ख्रिश्चन दफ़नभूमीस उपलब्ध करून देणेकरीता नगर विकास विभाग यांनी विनंती केली होती. शासन ज्ञापन दि. १६/०८/२०१४ अन्वये मौजे परजापूर येथील न.भू.क्र. ११ मधील २५०० चौ.मी. क्षेत्र ख्रिश्चन दफ़नभुमीस देण्यास शासन मान्यता यापूर्वीच देण्यात आली आहे.

अतिरीक्त सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दि. १७/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार जनहित याचिका क्र. ६६/२०१७ मधील दि. १३/११/२०१७ व दि. १७/११/२०१७ रोजीच्या सुनावणीदरम्यान देण्यात आलेल्या निर्देशास अनुसरून आणि नगर विकास विभागाच्या दि. २४/५/२०१६ रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने या प्रकरणी न.भु.क्र. ५८९ (भाग) मधील ५००० चौ.मी. जागा ख्रिश्चन दफनभुमीस देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मानवतेच्या दृष्टीकोनातून तसेच आरे परिसरातील ख्रिश्चन समुदायास आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून, आरे दुग्धवसाहत, मौजे पहाडी गोरेगांव, मुंबई येथील न.भु.क्र. ५८९ (भाग) मधील ५००० चौ.मी. जागा ख्रिश्चन दफनभुमीस देण्याकरीता महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देत आहे.

मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर जागेतून जाणा-या नाल्याबाबत विशेष उपाययोजना करुन देण्याच्या अटीस अधिन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे. उक्त नाल्याबाबत मुंबई महानगरपालिकेद्वारा करावयाच्या उपाययोजनेबाबत या विभागाची कोणतीही हरकत असणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२०१६०७३६४५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2017.11.20 16:11:20 +05'30'

(अशोक उईके)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
६. विभागीय आयुक्त (महसूल), कोकण विभाग, मुंबई
७. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, बांद्रा, मुंबई
८. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्धवसाहत, गोरेगाव (पू.), मुंबई
१०.निवड नस्ती, पदुम-१०